# जिल्हा परिषद

## १. सीआर/१६३/बीड/१४

फिर्यादी हे बीड जिल्हा, तालूका पाटोदा येथे रहावयास असून जिल्हा परिषद बीड शिक्षण विभागामध्ये कनिष्ठ प्रशासन अधिकारी म्हणून नोकरीस आहे. दिनांक २२/११/२०१३ रोजी फिर्यादी यांना शिक्षकांच्या बदल्यामधील अनियमिततेस जबाबदार धरुन निलंबीत करण्यात आलेले आहे. सदर निलंबन आदेशामधून मुक्त करुन पुन्हा कर्तव्यावर घेणे करीता फिर्यादी यांना जिल्हा परिषद बीड येथील सामान्य प्रशासन विभागातील लोकसेवक क्र.१) परशुराम अर्सुळ, सहायक प्रशासन अधिकारी, वर्ग—१, लोकसेवक क्र.२) देवीदास ठेकरे, वरिष्ठ सहायक, वर्ग—२, लोकसेवक क्र.३) पांडूरंग शिंदे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी वर्ग—३ यांनी आपसामध्ये संगनमत करुन फिर्यादी यांचे निलंबन रद्द करण्याचा प्रस्ताव पाठविण्यासाठी व विभागीय चौकशीमध्ये मदत करण्यासाठी, फिर्यादी यांचेकडे आलोसे यांनी रु. ५ लाखाची मागणी करुन करुन रु. १,१०,०००/— पूर्वी स्वीकारले. दिनांक ०१/०३/२०१४ रोजी उर्वरीत रक्कमेमधील रु.१,५०,०००/— मागणी करुन ती आलोसे क्र.१) परशुराम अर्सुळ व लोकसेवक क्र.३) पांडूरंग शिंदे यांनी स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

सदरबाबत शिवाजीनगर पोलीस ठाणे, जिल्हा बीड येथे गुरन ३०१४/२०१४ कलम ७, १२, १३ (१) (ड) सह १३ (२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून तीनही आरोपी लोकसेवक यांना अटक करण्यात आली आहे.